## गोदावरी व्यवस्थापन महाविद्यालयात जागतिक हात धुण्याचा दिवस साजरा !

जळगाव - गोदावरी व्यवस्थापन महाविद्यालयात जागतिक हात धुण्याचा दिवस साजरा करण्यात आला यावेळी महाविद्यालयाचे डॉ. चेतन सरोदे यांनी कार्यक्रमाची सुरुवात स्वतः हात धुवून केली व गोदावरी इंग्लिश मीडियम स्कूल येथील चिमुकल्यांना हात धुण्याचे महत्त्व पटवून दिले.

15 ऑक्टोंबर 2025, स्वच्छतेबाबत जनजागृती वाढवण्यासाठी दरवर्षी 15 ऑक्टोंबर रोजी जागतिक हात धुण्याचा दिवस साजरा केला जातो या दिवसाचे उद्दिष्ट म्हणजे लोकांमध्ये साबणाने हात धुण्याचे महत्त्व पटवून देणे आणि संसर्गजन्य आजारांपासून बचाव करणे.

केवळ स्वच्छ पाण्याने नाही तर साबणाने हात धुतल्यास विषाणू आणि जंतूंपासून संरक्षण होते. विशेषता जेवणापूर्वी हात धुणे अत्यावश्यक आहे कोविड साथीच्या आजारानंतर हात स्वच्छतेचे महत्व अधिकच अधोरेखित झाले आहे.

कार्यक्रमाचे आयोजन प्रा. प्रज्ञा बाविस्कर यांनी केले.